Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 10 April 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १० एप्रिल २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

जैन धर्माचे २४वे तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती आज साजरी होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरीकांना महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान महावीराचे आदर्श जगभरातल्या असंख्य लोकांना बळ देतात, असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

भगवान महावीर यांचं जन्मस्थान असलेल्या बिहारमधल्या वैशाली जिल्ह्यातल्या कुंडलपूरमध्ये शोभायात्रा, मस्तकाभिषेक आणि इतर धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. नालंदा इथंही पावापुरी मधल्या जैन मंदीरात जैन भाविक मोठ्या संख्येनं पूजा अर्चा करत आहेत.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राज्यातल्या जनतेला महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. हा दिवस तीर्थंकर भगवान महावीरांचं जीवन कार्य तसंच त्यांच्या अहिंसा, त्याग, क्षमा, जीवदया आणि अनेकांतवादाच्या शिकवणीचं स्मरण करून देतो, असं राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही महावीर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान महावीर यांच्या पवित्र संदेशांचा आपल्या जीवनात अंगीकार करतानाच त्यांनी आपल्याला सत्य आणि अहिंसेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा दिली, असं त्यांनी म्हटलं आहे.

****

जागतिक होमिओपॅथी दिन आज साजरा केला जात आहे. होमिओपॅथी ही आरोग्य सेवेसाठी समग्र दृष्टिकोन ठेवणारी जगातील दुसरी – सर्वात मोठी वैद्यकीय प्रणाली असून, त्यातील नैसर्गिक, अनाक्रमक पद्धतींमुळे लोक हे उपचार पसंत करतात. आयुष मंत्रालयाच्या मते, देशात १० कोटींहून अधिक लोक आरोग्याच्या गरजांसाठी होमिओपॅथीवर विश्वास ठेवतात. सध्या, देशात तीन लाख ४५ हजार नोंदणीकृत

होमिओपॅथी डॉक्टर, २७७ रुग्णालयं, आठ हजारांहून अधिक दवाखाने आणि २७७ शैक्षणिक संस्था आहेत.

****

रिझर्व्ह बँकेनं केलेल्या व्याजदर कपातीचं बँकांनी स्वागत केलं आहे. यामुळे गृह, वाहन आणि व्यक्तिगत कर्जांची मागणी वाढेल. मध्यम आणि छोट्या आकारांच्या शहरांमध्ये प्रामुख्यानं या मागणीत वाढ होईल, अशी प्रतिक्रिया इंडियन बँकेचे व्यवस्थापकीय संचालक बिनोद कुमार यांनी दिली आहे. तात्काळ व्याजदर कपातीची तयारीही त्यांनी दर्शवली आहे. जागतिक पातळीवर असलेल्या अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर ही व्याजदर कपात आणि इतर निर्णय दिलासादायक आहेत. अमेरिकेनं वाढवलेल्या आयात करांचा परिणाम थोडा कमी व्हायला यामुळे मदत होईल, अशी प्रतिक्रिया स्टेट बँकेचे अध्यक्ष सी. एस. शेट्टी यांनी दिली आहे. HDFC बँकेच्या मुख्य अर्थतज्ज्ञ साक्षी गुप्ता यांनी चालू आर्थिक वर्षात आणखी दोनवेळा व्याजदर कपातीची अपेक्षा व्यक्त केली.

****

योजना आखताना ग्रामीण भारताचा विकास नजरेसमोर ठेवायला हवा, त्यामुळे देशांतर्गत स्थलांतरं रोखता येतील, असं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत भरलेल्या किसान कुंभ कार्यक्रमात ते काल बोलत होते. सरकारी योजनांमुळे शेतकरी तसंच समाजातल्या कमकुवत वर्गाला फायदा व्हायला हवा, यामुळे राष्ट्रीय उत्पन्नामधलं त्यांचं योगदान वाढेल आणि शहराकडे स्थलांतर होण्याला आळा बसेल, असं ते म्हणाले.

****

पोषणाविषयी जागरुकता वाढवण्यासाठी महिला आणि बालविकास मंत्रालय पोषण पंधरवडा साजरा करत असून, हा उपक्रम मिशन पोषण २.० चा एक भाग आहे. नवजात अर्भकांच्या पहिल्या हजार दिवसांवर लक्ष केंद्रित करणं, गर्भधारणेपासून ते दोन वर्षांपर्यंतच्या पोषणाचं महत्त्व अधोरेखित करणं तसंच बालवयातलं पोषण यावर या उपक्रमाचा भर आहे.

****

कृषी विभागातील प्रयोगशील अधिकारी, निवृत्त अधिकारी, प्रयोगशील शेतकरी, विद्यापीठ तसंच परदेशातून आलेलं ज्ञान, पिकांचे वाण लोकाभिमुख कसे करता येतील या दृष्टीकोनातून आगामी काळात प्रयत्न करण्यात येतील, असं कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी सांगितलं. पुण्यात काल राज्यस्तरीय कृषी अधिकारी आणि कर्मचारी कार्यशाळेत ते बोलत होते. या कार्यशाळेत कृषी विभाग आणि

शेतकऱ्यांच्या समोरील वातावरण बदलाचे परिणाम, भविष्यातील संधी आणि आव्हानांना सामोरं जाणं, आणि शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवून त्यांना सक्षम करण्यावर विविध सत्रांमध्ये तज्ज्ञ मार्गदर्शन करण्यात आलं.

****

छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह महामानवांचा अवमान केल्याप्रकरणी अटक असलेल्या प्रशांत कोरटकर याला कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. ५० हजार रुपयांच्या जामीनावर त्याची सुटका करण्यात आली आहे. १२ एप्रिल रोजी कोरटकरच्या न्यायालयीन कोठडीची मुदत संपणार होती.

****

आरोग्य विभागानं दिलेल्या आदेशानुसार पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून शहरातील ८६० रुग्णालयांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये त्रुटी आढळलेल्या ८९ रुग्णालयांना नोटीस बजावण्यात आली आहे.

****

२०२५ च्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात पुरुषांच्या मिश्र सांघिक स्पर्धेत कांस्यपदक मिळवल्यामुळे या स्पर्धेत भारताला पहिलं पदक मिळालं आहे. अभिषेक वर्मा, ऋषभ यादव आणि ओजस देवतळे यांच्या संघानं काल अमेरिकेत ऑबर्न-डेल इथं झालेल्या सामन्यात डेन्मार्कचा २३०-२२३ गुणांनी पराभव केला. विविध देशांमध्ये चार टप्प्यात तिरंदाजी विश्वचषक स्पर्धा सुरू आहेत.

****